IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# ई-पुस्तक संस्कृतीचा मराठी प्रकाशन संस्थेवर आणि वाचन संस्कृतीवर होणारा परिणाम

**डॉ. शीतल सचिन गोर्डे-पाटील**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
विलिंग्डन महाविद्यालय (स्वायत्त), सांगली, महाराष्ट्र, भारत.
sheetalgorde12345@gmail.com

**सारांश** (Abstract) : *माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाने साहित्यविश्व आणि वाचनसंस्कृतीत बदल घडवून आणले आहेत. इंटरनेट, संगणक, स्मार्टफोन आणि विविध डिजिटल माध्यमांचा प्रभाव प्रकाशन संस्था आणि वाचन संस्कृती यावर होत आहे. परंपरागत मराठी प्रकाशन ही मुद्रण संस्कृतीवर आधारित ज्ञानप्रसाराची एक महत्त्वाची व्यवस्था असून, संपादक, प्रकाशक आणि वितरक यांच्या एकत्रीकरणातून पुस्तक निर्मितीची प्रक्रिया पूर्ण होते.*

*ई-पुस्तक वितरण जलद आणि कमी खर्चात अगदी जागतिक स्तरावर सहज शक्य आहे. परदेशातील मराठी वाचकांसाठी ई-साहित्य सहज उपलब्ध होते. तसेच नवोदित लेखकांना डिजिटल व्यासपीठ उपलब्ध होऊ शकते. तथापि, डिजिटल वाचन हे साहित्य आणि वाचन संस्कृतीत आव्हाने निर्माण करत आहे.*

*ई-पुस्तक संस्कृती मूळ मराठी प्रकाशन क्षेत्र आणि वाचनसंस्कृती यावर प्रभाव टाकते आहे. ती अधिक व्यापक, आधुनिक तंत्रज्ञानाधारित बनत आहे. भविष्यात मुद्रित आणि डिजिटल या दोन्ही माध्यमांचा समन्वय साधणे आवश्यक आहे.*

**की - वर्ड** : ई-पुस्तक संस्कृतीचा मराठी प्रकाशन संस्थेवर आणि वाचन संस्कृतीवर होणारा परिणाम

## I. प्रस्तावना :

माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या झपाट्याने साहित्यक्षेत्र आणि वाचनसंस्कृतीत बदल घडवून आणला आहे. इंटरनेट, संगणक स्मार्टफोन, आणि डिजिटल माध्यमांच्या विकासाच्या वापराच्या आधारावर ज्ञानप्रसाराचे शब्दही बदलले आहेत. या बदलाचे परिणाम साहित्य क्षेत्रावरही स्पष्टपणे झालेले आहेत. पारंपरिक कागदी पुस्तकांचा काळ जाऊन ई-पुस्तकांची संकल्पना विकसित झाली आहे. मराठी विश्वही गेल्या काही वर्षांमध्ये ई-पुस्तक संस्कृतीचा प्रसार वाढवणारा विषय हाताळत आहे. डिजिटल माध्यमांद्वारे फाइल्स प्रक्रिया तयार करणे आणि प्रकाशित करणे, वाचक तयार करणे आणि अधिक सुरक्षित करणे ही कामे जलद गतीने होत आहेत. मराठी प्रकाशन संस्था आपल्या पुस्तकांचे डिजिटल प्रकाशन करत आहेत. त्यांच्यासाठी ही संधी नवी आहे. यासाठी वाचकांना मोबाईल, टॅबलेट किंवा संगणकावर वाचन करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

ई-पुस्तक संस्कृतीमूळे मराठी प्रकाशन संस्था कार्यप्रणाली तसेच वाचन संस्कृती रचनाही बदलत आहेत. डिजिटल वाचनामूळे वाचकांची संख्या वाढण्याची स्थिती निर्माण झाली असली तरी पारंपरिक मुद्रित पुस्तकांचे मूल्यही कायम आहे. मुद्रणयंत्र शोधानंतर ज्ञान, साहित्य आणि माहितीचा व्यापक प्रसार शक्य झाला आहे. मुद्रणतंत्र विकासाममुळे पुस्तके, वृत्तपत्रे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत, यामुळे वाचनाची सवय आणि वाचन संस्कृती अधिक बळकट झाली आहे.

## II. पारंपरिक मराठी प्रकाशन व वाचन संस्कृती -

पारंपरिक प्रकाशन कार्य ही संस्कृतीवर आधारित साहित्य आणि ज्ञानप्रसाराची प्रक्रिया मानली जाते. यात लेखक, संपादक, प्रकाशक आणि वितरक घटक उपस्थित असतो. प्रकाशन कार्याची सुरुवात लेखकाच्या लेखनापासून होते. लेखक कादंबरी, कथा, कविता, संशोधनग्रंथ किंवा इतर साहित्य प्रकार लिहून त्याचे हस्तलिखित तयार करतो. हस्तलिखित प्रकाशकाकडे दिले जाते. प्रकाशक त्याची गुणवत्ता, विषय आणि वाचकांची गरज लक्षात घेऊन निवड करतो. यानंतर संपादनाची प्रक्रिया सुरू होते. संपादक

ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

हस्तलिखित भाषा आशय, शैली आणि रचना परीक्षण करून आवश्यक ते बदल करतो. पुस्तक वाचकांसमोर सादर करण्यासाठी एक व्यवस्था कार्यरत असते. पुस्तक विक्री केंद्र, ग्रंथालय, वाचनालये येथे पुस्तक वितरित केले जाते.

पारंपरिक पद्धतीने कार्यप्रणाली ही साहित्य पुस्तक छापण्याची नसून निर्मिती, ज्ञानप्रचार आणि वाचनसंस्कृती विकसित करणारी एक सांस्कृतिक प्रक्रिया आहे. आपल्या बौद्धिक आणि सांस्कृतिक विकासात परंपरागत संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. परंपरागत वाचनसंस्कृती म्हणजे मुद्रित पुस्तकांच्या वाचनाची सवय आणि ज्ञानप्राप्तीची परंपरा होय. परंपरागत वाचन संस्कृतीत ग्रंथालय वाचनालये, शैक्षणिक संस्था आणि पुस्तक विक्री केंद्रे यांची महत्त्वाची भूमिका असते. परंपरागत वाचनसंस्कृती ही समाजाची बौद्धिक आणि सांस्कृतिक विकासाची द्योतक मानली जाते.

## III. मराठी प्रकाशन संस्थांचा ऐतिहासिक वारसा-

मराठी प्रकाशनाची खरी सुरुवात १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात झाली. १८०५ मध्ये विल्यम कॅरे यांनी पहिले मराठी व्याकरण छापले, त्यामुळे मुद्रण संस्कृतीची पायाभरणी झाली. त्यानंतर, १८४०-५० च्या दरम्यान बाळशास्त्री जांभेकर यांच्यासारख्या समाजधुरिणांनी वृत्तपत्रे आणि नियतकालिकांच्या माध्यमातून ज्ञानाचे भांडार खुले केले.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कॉन्टिनेंटल, मॅजेस्टिक आणि पॉप्युलर प्रकाशन यांसारख्या दिग्गज संस्थांनी मराठी साहित्याला खऱ्या अर्थाने व्यावसायिक स्वरूप दिले. या संस्थांनी केवळ पुस्तके छापली नाहीत, तर पु. ल. देशपांडे, जी. ए. कुलकर्णी, आणि वि. स. खांडेकर यांसारखे साहित्यिक घडवले. १९७० च्या दशकात 'ग्रंथाली'सारख्या वाचक चळवळीने प्रकाशन क्षेत्राला लोकाभिमुख केले, तर मेहता पब्लिशिंग हाऊस आणि राजहंस प्रकाशन यांनी आधुनिक वितरण व्यवस्था आणि दर्जेदार निर्मितीचे नवे निकष प्रस्थापित केले.

## IV. पारंपरिक पद्धतीने पुस्तक प्रकाशन प्रक्रिया-

लेखक आपले हस्तलिखित प्रकाशकाकडे सोपवतो. संपादक त्याचे शुद्धलेखन, व्याकरण आणि आशयानुसार व्याकरण तपासून अंतिम संहितेची मांडणी करतात. पुस्तकासाठी योग्य कागदाची निवड केली जाते. छपाईनंतर पुस्तकाची आकर्षक बांधणी (HARDBOUND किंवा PAPERBACK) केली जाते. यात छपाई यंत्रणा, शाई आणि मजुरीचा मोठा खर्च असतो. तयार झालेली पुस्तके प्रकाशकाकडून वितरक, मग पुस्तक विक्रेते आणि शेवटी ग्रंथालये किंवा वाचकांपर्यंत पोहोचतात.

पारंपरिक प्रकाशनापुढील आव्हाने व मर्यादा-

पारंपरिक पद्धतीमुळे मराठी साहित्याचा पाया रचला गेला असला, तरी त्यात काही मर्यादा आहेत-

कागद, छपाई आणि साठवणुकीसाठी प्रकाशकाला मोठी गुंतवणूक करावी लागते. पुस्तके केवळ निवडक दुकानांत किंवा शहरांत उपलब्ध असल्याने ग्रामीण भागातील वाचकांपर्यंत पोहोचणे कठीण असते. पुस्तकाची जाहिरात करण्यासाठी वर्तमानपत्रे किंवा प्रदर्शनांवर अवलंबून राहावे लागते, त्यामुळे पुस्तकाचा प्रसार मर्यादित राहतो.

### ई-पुस्तक संकल्पना-

ई-पुस्तक म्हणजे कागदाऐवजी डिजिटल स्वरूपात तयार केलेले पुस्तक, जे PDF, EPUB किंवा MOBI या फॉरमॅट्समध्ये उपलब्ध असते. ही पुस्तके आपण स्मार्टफोन, टॅब्लेट, संगणक किंवा ई-रीडर (उदा. किंडल) वर सहज वाचू शकतो.

### ई- पुस्तक वैशिष्ट्ये-

इंटरनेटच्या माध्यमातून जगात कुठेही, काही सेकंदात पुस्तक डाउनलोड करून वाचनास सुरुवात करता येते. एका लहान उपकरणात हजारो पुस्तकांचा संग्रह करता येतो, ज्यामुळे वैयक्तिक ग्रंथालय खिशात बाळगणे शक्य झाले आहे. ई-पुस्तकांमुळे साहित्याचे वितरण अत्यंत जलद आणि व्यापक झाले असून, जागतिक स्तरावर मराठीचा प्रसार वाढला आहे.

थोडक्यात, ई-पुस्तक हे तंत्रज्ञान आणि साहित्याचा असा संगम आहे, ज्याने वाचन संस्कृतीला अधिक सुलभ, स्वस्त आणि आधुनिक बनवले आहे. मराठी प्रकाशन विश्वात स्मार्टफोन आणि स्वस्त इंटरनेटच्या क्रांतीमुळे 'डिजिटल युगाचे' आगमन झाले असून, त्याचे स्वरूप आता आंतरराष्ट्रीय झाले आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

### डिजिटल क्रांती आणि मराठी प्रकाशन-

२१व्या शतकात तंत्रज्ञानाच्या वेगामुळे प्रकाशन व्यवसायाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. पारंपरिक मुद्रित पुस्तकांकडून डिजिटल माध्यमांकडे होणारा हा प्रवास अत्यंत लक्षणीय आहे. २०१० नंतर मराठीत ई-बुक्सचा कल वाढला. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ने २०१३ मध्ये अधिकृतपणे ई-बुक क्षेत्रात प्रवेश करून हा नवा मार्ग दाखवला. आज किंडल आणि गुगल बुक्सवर हजारो मराठी पुस्तके उपलब्ध आहेत. वाचनापेक्षा ऐकण्याकडे कल असलेल्या नवीन पिढीसाठी 'स्टोरीटेल' सारख्या प्लॅटफॉर्मने क्रांती केली आहे. साहित्यातील दिग्गज कलाकृती आज नामवंत कलाकारांच्या आवाजात ऐकायला मिळतात, त्यामुळे साहित्य घराघरात पोहोचले आहे. आता पुस्तकांची जाहिरात केवळ वर्तमानपत्रापुरती मर्यादित नसून फेसबुक, इन्स्टाग्राम आणि यूट्यूबच्या माध्यमातून केली जाते. 'बुकगंगा' किंवा 'ॲमेझॉन' सारख्या वेबसाइट्समुळे जगाच्या पाठीवर कुठेही बसलेला मराठी माणूस एका क्लिकवर पुस्तक मिळवू शकतो. डिजिटल माध्यमांमुळे लेखकांना आता मोठ्या प्रकाशन संस्थांवर अवलंबून राहण्याची गरज उरलेली नाही. ब्लॉग्स, प्रतिलिपि आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून नवोदित लेखक थेट वाचकांशी संवाद साधत आहेत.

आजच्या डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात या पारंपारिक मर्यादांवर मात करण्यासाठी ई-पुस्तकांचा उदय झाला आहे. यामुळे छपाई आणि वितरणाचा खर्च कमी होऊन साहित्य अधिक व्यापक झाले आहे.

## V. प्रमुख डिजिटल प्रकाशन संस्था-

मेहता पब्लिशिंग हाऊस ही संस्था मराठीतील ई-बुकच्या क्षेत्रात आद्य मानली जाते. २०१३ मध्ये त्यांनी मोठ्या प्रमाणावर ई-बुक्स प्रकाशित करण्यास सुरुवात केली. आज त्यांच्या वेबसाईटवर आणि ॲपवर शेकडो मराठी पुस्तके डिजिटल स्वरूपात उपलब्ध आहेत. राजहंस प्रकाशनने दर्जेदार साहित्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या या संस्थेनेही आपली पुस्तके डिजिटल स्वरूपात वाचकांसाठी उपलब्ध करून दिली आहेत. मनोविकास प्रकाशनाने वैचारिक आणि सामाजिक विषयांवरील पुस्तकांसाठी प्रसिद्ध असलेल्या या संस्थेने डिजिटल माध्यमाचा प्रभावी वापर केला आहे. रोहन प्रकाशन या संस्थेनेही आपल्या पुस्तकांचे ई-बुक्स आणि डिजिटल मार्केटिंगमध्ये मोठे नाव कमावले आहे.

### डिजिटल प्लॅटफॉर्म्स आणि ई-साहित्य

ई-साहित्य प्रतिष्ठान ही संस्था प्रामुख्याने मोफत ईबुक्स उपलब्ध करून देण्यासाठी प्रसिद्ध आहे. नवोदित लेखकांसाठी हे एक मोठे डिजिटल व्यासपीठ बनले आहे. बुकगंगा हे मराठी पुस्तकांचे जगातील सर्वात मोठ्या ऑनलाइन दालनांपैकी एक म्हणून हे ओळखले जाते. त्यांनी केवळ विक्रीच नाही, तर ई-बुक्स आणि ऑडीओ ई-बुक्सच्या क्षेत्रातही मोठे काम केले आहे. स्टोरीटेल ही मूळची परदेशी संस्था असली, तरी तिने मराठीतील नामवंत प्रकाशन संस्थांशी करार करून मराठी ई-बुक्सचे मोठे जाळे विणले आहे. सकाळ मीडिया ग्रुप वृत्तपत्रांच्या डिजिटल क्षेत्रात 'ई-सकाळ हे भारतातील पहिले मराठी न्यूज पोर्टल ठरले आहे.

### जागतिक प्रसार आणि मराठीचे अस्तित्व-

डिजिटल माध्यमामुळे मराठी साहित्याचा प्रसार आता महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून जगभर झाला आहे. परदेशात राहणाऱ्या मराठी बांधवांसाठी ई-पुस्तके हे त्यांच्या भाषेशी जोडले जाण्याचे मुख्य साधन ठरले आहे. यामुळे मराठी साहित्याचे जागतिकीकरण झाले असून मराठी भाषेला एक आधुनिक ओळख मिळाली आहे.

मोबाईलवर वाचन करणे सोपे झाल्यामुळे तरुण पिढी पुन्हा मराठी साहित्याकडे वळत आहे. प्रवासात, विश्रांतीच्या वेळी किंवा कामाच्या मधल्या काळात पुस्तके वाचता येत असल्याने वाचन संस्कृती अधिक प्रगल्भ होत आहे. 'ई-ॲडिशनल' सुविधांमुळे मूळ पुस्तकांसोबतच लेखकांचे व्हिडिओ, मुलाखती आणि ऑडिओ लिंक्स उपलब्ध होतात.

### खर्चात मोठी कपात-

पारंपरिक प्रकाशनात पुस्तक वाचकांच्या हातापर्यंत पोहोचण्यापूर्वी कागद खरेदी, छपाई आणि बांधणी यांवर मोठा खर्च करावा लागतो. ई-पुस्तकांच्या बाबतीत ही छपाईची आवश्यकता पूर्णपणे नष्ट झाली आहे. यामुळे प्रकाशनाचा प्रारंभिक खर्च लक्षणीयरीत्या कमी झाला असून, लेखक कमी किमतीत वाचकांना पुस्तके उपलब्ध करून देऊ शकतात.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

**जलद प्रकाशन प्रक्रिया-**
छापील पुस्तक तयार होण्यासाठी महिनाभराचा किंवा त्याहून अधिक काळ लागू शकतो. मात्र, ई-पुस्तक प्रकाशनाची प्रक्रिया अत्यंत जलद आहे. एकदा साहित्याचे संपादन आणि मांडणी पूर्ण झाली की, काही तासांतच ते इंटरनेटवर जगभरातील वाचकांसाठी उपलब्ध करून देता येते. ही गतिशीलता आजच्या काळातील सर्वात मोठा 'लाभार्थी' घटक ठरली आहे.

**साठवणूक आणि वाहतुकीची गरज नाही-**
प्रकाशकांसाठी पुस्तकांचा साठा करून ठेवण्यासाठी गोदामांची गरज लागते आणि वाहतुकीचा खर्चही मोठा असतो. ई-पुस्तके ही डिजिटल डेटाबेस मध्ये साठवली जात असल्याने कोणत्याही भौतिक जागेची गरज उरत नाही. 'शून्य साठवणूक खर्च' हे डिजिटल प्रकाशनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

**पर्यावरणपूरक पर्याय-**
कागदाच्या निर्मितीसाठी झाडांची कत्तल करावी लागते. ई-पुस्तकांच्या आगमनामुळे कागदाचा वापर टळला आहे, ज्यामुळे ही पर्यावरणपूरक वाचन संस्कृती भविष्यासाठी अधिक शाश्वत ठरत आहे.

**जागतिक उपलब्धता-**
ई-पुस्तकांमुळे वितरणाची साखळी अत्यंत सोपी झाली आहे. एकदा इंटरनेटवर पुस्तक अपलोड झाले की, ते एकाच वेळी मुंबई, लंडन किंवा न्यूयॉर्कमधील वाचकांसाठी उपलब्ध होते. यासाठी कोणत्याही कुरिअर किंवा पोस्टाची गरज भासत नाही.

**पुस्तकांचे वितरण-**
पुस्तकांनी मराठी साहित्याच्या वितरण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. पूर्वी पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अनेक मर्यादा होत्या, ज्या आता डिजिटल तंत्रज्ञानामुळे संपुष्टात आल्या आहेत. पारंपरिक वितरण पद्धतीत पुस्तके मुख्यत्वे पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरांतील दुकानांमध्येच उपलब्ध असायची. ग्रामीण भागातील किंवा परदेशातील वाचकांना ही पुस्तके मिळवण्यासाठी मोठी प्रतीक्षा करावी लागायची. ई-पुस्तकांमुळे आता इंटरनेटच्या साहाय्याने कोणत्याही दुर्गम भागातून किंवा परदेशातून पुस्तक क्षणात डाउनलोड करून वाचता येते. छापील पुस्तकांच्या वितरणात कुरिअर किंवा टपालाचा वेळ लागतो. मात्र, ई-पुस्तक खरेदी केल्याबरोबर वाचकाला त्याचे 'ॲक्सेस' मिळते. ही तात्काळ उपलब्धता आजच्या धावपळीच्या युगातील वाचकांसाठी अत्यंत सोयीस्कर ठरली आहे.

**जागतिकीकरण आणि मराठीचा प्रसार-**
मराठी साहित्याला आता जागतिक व्यासपीठ मिळाले आहे. अमेझॉन किंडल, गुगल बुक्स आणि बुकगंगा यांसारख्या प्लॅटफॉर्म्समुळे मराठी पुस्तके जगभरातील मराठी डायस्पोरासाठी उपलब्ध झाली आहेत. यामुळे मराठी भाषेचा प्रसार केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता वैश्विक झाला आहे.

**स्व-प्रकाशन लेखकांसाठी वरदान-**
नवोदित लेखकांसाठी पारंपारिक वितरणाचे अडथळे आता दूर झाले आहेत. लेखकाला आता वितरणासाठी मोठ्या प्रकाशकांवर अवलंबून राहण्याची गरज नाही. तो स्वतःचे साहित्य स्वतःच जागतिक स्तरावर प्रदर्शित करू शकतो. छपाई, साठवणूक आणि वाहतुकीचा खर्च शून्य असल्याने, पुस्तकाची किंमत कमी ठेवता येते, ज्याचा फायदा वाचकांना होतो. स्व-प्रकाशनामुळे लेखकाला आपल्या साहित्यातून मिळणारा नफ्याचा मोठा हिस्सा स्वतःकडे ठेवता येतो.

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in
DOI: 10.48175/IJARSCT-37532

**साठवणुकीची कटकट नाही-**

पुस्तकांचे वितरण करताना साठवणूक हा एक मोठा खर्च असतो. डिजिटल वितरणात हा प्रश्नच उद्भवत नाही. एकाच सर्व्हरवर लाखो पुस्तके साठवता येतात आणि ती एकाच वेळी लाखो वाचकांना वितरित करता येतात.

परदेशातील मराठी वाचकांशी संपर्क-

डिजिटल प्रकाशनामुळे भौगोलिक सीमा ओलांडणे शक्य झाले आहे. अमेरिका, युरोप किंवा ऑस्ट्रेलियात स्थायिक असलेल्या मराठी वाचकांना आता भारतातील पुस्तकांसाठी कुरिअरची वाट पाहावी लागत नाही. ई-पुस्तकांमुळे जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात बसलेला वाचक एका सेकंदात नवीन पुस्तक विकत घेऊन वाचू शकतो. यामुळे जागतिक मराठी वाचकवर्ग विस्तारला आहे.

**स्व-प्रकाशन संकल्पना-**

पारंपरिक प्रकाशनात प्रकाशकाचा होकार मिळवणे, मुद्रण खर्च करणे आणि वितरण साखळी सांभाळणे हे नवोदित लेखकांसाठी मोठे आव्हान असते. डिजिटल माध्यमामुळे ही प्रक्रिया सोपी झाली आहे. लेखक ते वाचक थेट संवाद: लेखक स्वतःचे साहित्य ई-पुस्तक स्वरूपात (उदा. KINDLE DIRECT PUBLISHING) स्वतःच प्रकाशित करू शकतात. कागद, छपाई आणि साठवणुकीचा खर्च नसल्यामुळे कमी गुंतवणुकीत पुस्तक प्रकाशित करता येते.स्वातंत्र्य: पुस्तकाचे मुखपृष्ठ, किंमत आणि मांडणी यावर लेखकाचे पूर्ण नियंत्रण असते. नवोदित लेखकांना नवी चालना मिळाली. अनेक प्रतिभावान लेखक जे केवळ संधीअभावी मागे होते, त्यांना 'प्रतिलिपि', 'स्टोरीमिरर' किंवा 'ॲमेझॉन किंडल' यांसारख्या प्लॅटफॉर्ममुळे हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे. यामुळे मराठी साहित्यात वैविध्य आले असून, नवनवीन प्रयोग करणारे लेखक समोर येत आहेत.

**मराठी साहित्याला नवी दिशा-**

डिजिटल क्रांतीमुळे केवळ पुस्तकेच नाही, तर मराठी ब्लॉगिंग, पॉडकास्ट आणि सोशल मीडिया लेखनालाही प्रतिष्ठा मिळाली आहे. यामुळे संपूर्ण मराठी साहित्यिक पर्यावरणात एक नवीन ऊर्जा निर्माण झाली असून, साहित्याचा प्रवास हा केवळ छपाईपुरता मर्यादित न राहता तो 'कंटेंट' आधारित झाला आहे. थोडक्यात, डिजिटल माध्यमांनी मराठी लेखकांसाठी 'माझे पुस्तक, माझा वाचक' हे स्वप्न प्रत्यक्षात आणले आहे.

## VI. नव्या वाचन संस्कृतीची काही प्रमुख समस्या व गरज-

ई-पुस्तकांच्या (E-BOOKS) वाढत्या प्रसारामुळे वाचन सुलभ झाले असले, तरी त्यासोबत काही गंभीर मर्यादा आणि समस्या देखील निर्माण झाल्या आहेत. डिजिटल पायरसी ही ई-पुस्तकांसमोरची सर्वात मोठी समस्या आहे. इंटरनेटवर पुस्तकांच्या बेकायदेशीर पीडीएफ प्रती सहज उपलब्ध होतात. यामुळे लेखक आणि प्रकाशक यांच्या हक्कांचे उल्लंघन होऊन त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. अनेक वाचकांसाठी पुस्तक वाचणे हा केवळ माहिती मिळवण्याचा मार्ग नसून एक अनुभव असतो. कागदी पुस्तकांचा स्पर्श, पानांचा सुगंध आणि ते संग्रही ठेवण्याचा आनंद डिजिटल माध्यमात मिळत नाही. यामुळे मुद्रित पुस्तकांचे मूल्य आजही टिकून आहे. ई-पुस्तके वाचण्यासाठी मोबाईल, टॅब्लेट किंवा ई-रीडरच्या स्क्रीनवर बराच वेळ पाहावे लागते. यामुळे डोळ्यांवर ताण येणे, निद्रानाश आणि डोकेदुखी यांसारख्या आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात. ई-पुस्तके वाचण्यासाठी उपकरणाची बॅटरी, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि विशिष्ट सॉफ्टवेअरची गरज असते. तांत्रिक बिघाड झाल्यास वाचनात व्यत्यय येतो, जो कागदी पुस्तकांच्या बाबतीत कधीच येत नाही. मोबाईल किंवा टॅब्लेटवर वाचन करताना सोशल मीडियाचे नोटिफिकेशन्स किंवा इतर ॲप्समुळे वाचकाची एकाग्रता वारंवार भंग पावते.

ई-वाचनामुळे वाचकाला आता जाडजूड पुस्तके सोबत नेण्याची गरज उरलेली नाही. मोबाईल, टॅबलेट किंवा ई-रीडर यांसारख्या एकाच उपकरणात हजारो पुस्तकांचा संग्रह करणे शक्य झाले आहे. प्रवासात किंवा फावल्या वेळात वाचन करणे यामुळे अत्यंत सोपे झाले आहे. तंत्रज्ञानाशी जवळीक असलेला युवा वर्ग आता छापील पुस्तकांऐवजी डिजिटल स्वरूपातील साहित्याला पसंती देत आहे. सोशल मीडिया, ब्लॉग्स आणि विविध वाचन ॲप्समुळे वाचनाची आवड एका क्लिकवर पूर्ण होत आहे. डिजिटल माध्यमांमुळे केवळ कादंबऱ्याच नाही, तर जगभरातील वैचारिक, शैक्षणिक आणि दुर्मिळ साहित्य वाचकांना सहज उपलब्ध होत आहे. यामुळे वाचकांची वैचारिक कक्षा रुंदावत आहे. ई-वाचनात वाचकाला महत्त्वाच्या ओळी हायलाईट करणे, शब्दांचे अर्थ लगेच शोधणे किंवा वाचनाचा

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

फॉन्ट बदलणे अशा सुविधा मिळतात, ज्यामुळे वाचन प्रक्रिया अधिक सुलभ होते. कागदाचा वापर टाळला जात असल्याने ई-वाचन हे पर्यावरणपूरक मानले जाते, ज्यामुळे ही नवी संस्कृती भविष्यातील 'शाश्वत वाचन संस्कृती' म्हणून उदयाला येत आहे.

## VII. निष्कर्ष-

१. कागदी आणि डिजिटल ही दोन्ही वाचन माध्यमे आपापल्या जागी अनन्यसाधारण महत्त्वाची आहेत.
२. कागदी पुस्तकांमुळे वाचकाला उच्च दर्जाची एकाग्रता आणि पारंपरिक वाचनाचा आनंद मिळतो.
३. पुस्तक हाताळण्याचा भावनिक अनुभव हे कागदी माध्यमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे.
४. आधुनिक काळातील वाचक आपल्या सोयीनुसार आणि गरजेनुसार दोन्ही माध्यमांचा पूरक वापर करत आहेत.
५. डिजिटल माध्यमांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे वाचनसंस्कृतीचा परीघ अधिक विस्तारत आहे.
६. भविष्यात मुद्रित मूल्य आणि तंत्रज्ञान यांच्या समन्वयातून वाचनसंस्कृती अधिक समृद्ध होईल.

## संदर्भ-

१. अजनाळकर, अमर, डिजिटल मार्केटिंगच्या दुनियेत, किंडल प्रकाशन, १९ एप्रिल २०१९.
२. सुतार, प्रफुल्ल, सोशल मिडिया-  डिजिटल दुनिया, मल्टीवरसिटी प्रकाशन, २०१५.
३. Https://sahitya.marathi.gov.in/
४. Https://www.esahity.com/
५. Https://archive.org/search?query=creator%3a%22digital+library%2c+mulund%22
६. Https://www.bookganga.com/ebooks/books/details/5738176646736864938
७. Https://akshardhara.com/products/mul0006-social-media-digital-duniya?srsltid
८. Https://akshaybankar24.blogspot.com/2017/04/blog-post.html
९. Https://marathi.pratilipi.com/story/digital-yuga